| | |
|---|---|
| MHWS090011752021 | दाखल दिनांक : ०८.१०.२०२१<br>नोंदणी दिनांक : ०८.१०.२०२१<br>निकाल दिनांक : ०२.०५.२०२६<br>कालावधी : ०४ व. ०७म. ००दि. |

**प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, (न्यायालय क्र. २), मानोरा यांचे न्यायालयात**

(पिठासीन अधिकारीः श्रीमती तृष्णा गो. बन्सोड)

**नि.फौ.ख. क्र.१४३/२०२१** **निशाणी क्र.–२७**

गुन्हयाचा तपशिल

गुन्हा क्र. : ३३७/२०२१

पोलीस स्टेशन : मानोरा पोलीस स्टेशन, मानोरा.

| | |
|---|---|
| अभियोगपक्ष | महाराष्ट्र शासन तर्फे– पोलीस ठाणे अधिकारी,मानोरा तालुका पोलीस स्टेशन,मानोरा . |
| अभियोगपक्षातर्फे | विशेष सहा. सरकारी अभियोक्ता– श्री. एम. जी. शर्मा |
| आरोपी पक्ष | बाळु उत्तम राठोड |
| आरोपी पक्षातर्फे | विद्वान विधीज्ञ पी. जी. अग्रवाल |

**गुन्हयाचा तपशिल**

| | |
|---|---|
| गुन्हयाची तारीख | २५/०५/२०२१ |
| प्रथम खबरी अहवाल तारीख | २६/०५/२०२१ |
| दोषारोपपत्र दाखल तारीख | ०२/१०/२०२१ |
| दोषारोप निश्चित तारीख | २५/०३/२०२५ |
| पुरावा सुरु झाल्याची तारीख | ०१/०८/२०२५ |
| न्यायनिर्णय राखीव ठेवल्याची तारीख | -- |
| न्यायनिर्णयाची तारीख | ०२/०५/२०२६ |
| शिक्षेच्या आदेशाची तारीख, जर असेल तर | -- |

नि.फौ.ख.क्र. १४३/२०२१

(न्यायनिर्णय) सरकार ..वि..बाळू

## आरोपीचा तपशिल

| आ. क्र. | आरोपीचे नाव | अटक तारीख | जामीन तारीख | गुन्हा कलम | निर्दोष सोडले किंवा शिक्षा दिली | शिक्षेचे स्वरुप | जेलमध्ये बंद असलेला कालावधी – कलम ४२८ फौ.प्र.सं. प्रमाणे |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | **बाळु उत्तम राठोड** वयः४० वर्षे, धंदाः शेती रा. ता. मानोरा, जि. वाशिम. | ०७/०६/२०२१ | ०७/०६/२०२१ | भा.दं.वि. चे कलम २९४, ४२७, ५०४, ५०६ प्रमाणे | निर्दोष सोडले | -- | -- |

## न्या य नि र्ण य

(पारित केल्याचा दिनांक ००/०४/२०२६)

प्रस्तुतचा खटला आरोपीविरुध्द भारतीय दंड संहिता, १८६० चे कलम २९४, ४२७, ५०४, ५०६ नुसार न्यायप्रविष्ठ आहे.

**सरकार पक्षाची थोडक्यात हकीकत अशी आहे की,**

२. घटना दिनांक २५/०५/२०२१ रोजी संध्याकाळी ०६:३० वाजताचे दरम्यान ग्राम–हातना, ता. मानोरा जि. वाशिम येथे घडली. सदर दिवशी ग्राम–हातना येथे फिर्यादी त्यांची बेलोरा वाहन क्र.जी.जे. ०६झेड १००८ ने नेहमीप्रमाणे मजुर परत नेण्यासाठी त्यांचे वाहन गावाबाहेर उभे केले. तेथे आरोपी आला व फिर्यादीला ''तुमच्यामुळे गावातील जिल्हापरिषद शाळेसमोर खुप पाणी साचले आहे, तुमचा आम्हाला खुप त्रास आहे, मादरचोद हो, तुमचा मालक कोठे आहे त्याला येथे बोलावा अशी अश्लील भाषेत शिवीगाळ केली व फिर्यादीच्या कानपटात चापट मारली व फिर्यादीच्या वाहनाचे काचा लाकडी दांड्याने फोडून गाडीचे अंदाजे ५० हजार रुपयाचे नुकसान केले तसेच जीवे मारण्याची धमकी दिली.त्या अनुषंगाने फिर्यादीने घडलेल्या घटनेबाबत मानोरा पोलिस ठाणे येथे तक्रार दिली.

३. पोलीसांनी आरोपीविरुध्द गुन्हा क्र.३३७/२०२१ प्रमाणे भारतीय दंड संहिताचे कलम २९४, ४२७, ५०४, ५०६ अन्वये गुन्हा नोंदविला. तपासिक अंमलदार यांनी

घटनास्थळ पंचनामा तयार केले, साक्षीदारांचे बयाण नोंदविले व तपासाअंती आरोपीविरुध्द दोषारोप पत्र दाखल केले.

४. आरोपीविरुध्द भा.दं.वि. चे कलम २९४, ४२७, ५०४, ५०६ अन्वये नि.क्र.१४ वर दोषारोप निश्चित केले. आरोपीला दोषारोप वाचुन व समजावून सांगितला असता त्यांनी तो अमान्य केला व प्रकरण सुरु ठेवण्याची तयारी दर्शविली. आरोपीची जबानी निशाणी क्र. ११५ वर आहे. सरकारपक्षाने आरोपीविरुध्दचे दोषारोप सिध्द करण्यासाठी केवळ एक साक्षीदार, साक्षीदार क्र.१ अशोक सवाई राठोड (घटनास्थळ पंच) यांना नि.क्र.२१ वर तपासले आहे. प्रकरणात अभियोगपक्षास पुरेपुर संधी देवूनही त्यांचे मार्फत फिर्यादी, इतर महत्वपुर्ण साक्षीदार व तपासी अधिकारी यांना पुराव्याकामी हजर करण्यात आले नाही. आरोपीविरुध्द फौजदारी प्रक्रिया संहिताचे, कलम ३१३(१)(ब) नुसार बयाण नोंदविण्यात आले नाही.

५. दोन्ही पक्षांचा युक्तीवाद ऐकला.

६. सरकार पक्षाचे हकीकत व आरोपींचा बचाव यावरुन निराकरणासाठी खालीलप्रमाणे मुद्दे उपस्थित होतात. सदर मुद्दे व त्यावरील माझे निष्कर्ष, कारणमीमांसासह खालीलप्रमाणे आहेः–

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अभियोगपक्ष हे सिध्द करते काय की दिनांक २५/०५/२०२१ रोजी ग्राम–हातना, ता.मानोरा, जि. वाशिम येथे सार्वजनिक ठिकाणी आरोपीने फिर्यादी जयसिंग खेमा डिडोर यांना अश्लील भाषेत शिवीगाळ केली आणि त्याद्वारे भा.दं.वि.चे कलम २९४ अन्वये गुन्हा केला ? | **...नाही** |
| २. | अभियोगपक्ष पुढे असे सिध्द करते काय की,उपरोक्त दिनांक, वेळी व ठिकाणी आरोपीने फिर्यादी यांचे वाहन क्र.जी.जे.०६झेड–४००८ तोडफोड करुन ५० हजार रुपयाचे नुकसान करुन आगळीक केली व तसे करुन भारतीय दंड संहिताचे कलम ४२७ | **...नाही** |

| | | |
|---|---|---|
| | अन्वये गुन्हा केला ? | |
| ३. | अभियोगपक्ष पुढे असे सिध्द करतो काय की, उपरोक्त दिनांक वेळी व ठिकाणी आरोपीने फिर्यादीला शांतता भंग करुन अपमान केला व तसे करुन भारतीय दंड संहिताचे कलम ५०४ अन्वये गुन्हा केला ? | **...नाही** |
| ४. | अभियोगपक्ष पुढे असे सिध्द करते काय की, उपरोक्त दिनांक वेळी व ठिकाणी आरोपीने फौजदारी स्वरुपाचा धाकदपटशा करुन फिर्यादी यांना जीवे मारण्याची धमकी दिली व तसे करुन भा.दं.वि.चे कलम ५०६ अन्वये गुन्हा केला ? | **...नाही** |
| ५. | काय आदेश ? | **अंतिम आदेशाप्रमाणे** |

## <u>का र ण मि मां सा</u>

**<u>मुद्दा क्रमांक १ ते ४ बाबतः–</u>**

७. वरील मुद्दे एकमेकांशी निगडीत असल्याने चर्चेकरीता एकत्रित विचारात घेण्यात येत आहे. साक्षीदार क्र.१ अशोक हे या प्रकरणातील घटनास्थळ पंच साक्षीदार असून सदर साक्षीदाराने अभियोग पक्षास सहकार्य केलेले नाही. सदरील साक्षीदाराने पोलिसांनी त्यांच्या समक्ष घटनास्थळ जप्ती पंचनामा तयार करण्याची बाब स्पष्टपणे नाकारली आहे. तसेच त्यांनी घटनेबाबत काहीही कथन केलेले नाही. म्हणून त्यांच्या पुराव्यावर विश्वास ठेवता येत नाही.

८. प्रकरणात फिर्यादी, इतर महत्वपुर्ण साक्षीदार व तपासी अधिकारी यांना वारंवार समंस काढूनही अभियोगपक्ष त्यांना पुराव्याकामी हजर ठेवण्यास असमर्थ ठरले. वर चर्चा केल्याप्रमाणे फिर्यादी व इतर साक्षीदारांच्या पुरक पुराव्या अभावी आरोपीविरुद्ध गुन्ह्याचे घटक सिद्ध होत नाही. गुन्ह्याचे घटन सिद्ध करण्याइतरपत कोणताही पुरक पुरावा अभिलेखावर आला नाही. अभिलेखावरील पुरावा आरोपीवरील आरोपी सिद्ध करण्यास पुरेसा नाही. करीता मुद्दे क्र. १ ते ४ चे निष्कर्ष 'नकारार्थी' देण्यात येत आहे.

**मुद्दा क्रमांक ५ बाबतः–**

९. वरील बाबींची तुलनात्मक पडताळणी केली असता असे दिसून येते की, कथित घटनेच्या दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपीने अश्लील भाषेत शिवीगाळ करुन फिर्यादीच्या कथित वाहनाची तोडफोड करुन ५० हजार रुपयाचे नुकसान केल्याचे तसेच जीवे मारण्याची धमकी दिल्याची बाब निःसंदेहपणे सिध्द झालेली नाही. अभियोगपक्षाने भारतीय दंड संहिता, १८६० चे कलम २९४, ४२७, ५०४, ५०६ मधील घटकांची पुर्तता केलेली नाही. त्यामुळे आरोपीला दोषी ठरविता येत नाही, म्हणुन आरोपी निर्दोष मुक्त होणेस पात्र आहे. करीता वरील सर्व बाबींचा विचार करुन मुद्दा क्र.५ बाबत खालील आदेश पारीत करीत आहे.

**आ दे श**

१. आरोपी **बाळू उत्तम राठोड** यांना फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम २४८(१) नुसार भारतीय दंड संहिताचे कलम २९४, ४२७, ५०४, ५०६ अंतर्गत शिक्षेस पात्र अपराध केल्याचे आरोपातून निर्दोष मुक्त करण्यात येते.

२. आरोपीचे जामीन बंधपत्र रद्द करण्यात येत आहे.

३. आरोपीने फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ४३७(अ) च्या पुर्ततेकरीता जमानत दाखल करावी.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषित करण्यात आला.)

DISTRICT COURTS MAHARASHTRA
Digitally signed by TRUSHNA GOVINDRAO BANSOD
Date: 2026.05.02 17:32:22 +0530

**(तृष्णा गो. बन्सोड)**
दि. ०२/०५/२०२६ न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग,
(न्यायालय क्र.२), मानोरा.

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this PDF file Judgment/Order are same word to word as per the original Judgment/Order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | - | Smt. R. K. Chavhan (L.G.) |
| Court | - | (Smt. T. G. Bansod)<br>Jt. CJJD & JMFC, Manora. |
| Date of Judgment/Order | - | 02/05/2026 |
| Judgment/Order signed by the Presiding Officer on | - | 02/05/2026 |
| Judgment/Order uploaded on | - | 02/05/2026 |